# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ३१.०८.२०२६ सोमवार**

**सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :—**

दिनांक ३१.०८.२०२६ चे १७.०० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस भवन ऑडोटोरीयम हॉल येथे ऑगस्ट—२०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेखाली तसेच, मा. श्री. राहुल माकनिकर पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) आणि मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहायक पोलीस आयुक्त (मानव संसाधन), नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे पोलीस उपनिरीक्षक, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार पदावरील एकुण **२५** अधिकारी आणि अंमलदार यांना सपत्नीक भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. सह पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या पोलीस खात्यातील योगदानाचे कौतुक केले. तसेच, समाजात कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता सेवानिवृत्त पो. अधिकारी व अंमलदार यांनी दिलेल्या बहुमुल्य सेवेबद्दल पोलीस दलातर्फे कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तांना पुढील सुखी, समृध्द आणि निरोगी आयुष्याकरीता शुभेच्छा देवुन, निरोगी आयुष्याकरीता व्यायामाचे महत्व समजावून सांगितले. तसेच, सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या रकमेचा व्यवस्थीत खर्च करण्यास सांगुन सायबर स्कॅम पासुन स्वत:चा बचाव करण्याबद्दलसुध्दा मार्गदर्शनही केले. कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे पोलीस दलात सेवा दिल्याबद्दल मा. सह पोलीस आयुक्त यांनी व उपस्थीत इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व सेवा प्रमाणपत्र देवुन यथोचित गौरव करण्यात आला. यांसोबतच श्री. अभय बंग लिखीत आणि आरोग्यासाठी काही उपयोगी माहीती व पध्दती यांचा उल्लेख असलेले 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' नावाचे पुस्तकाची प्रत सुध्दा प्रदान करण्यात आली.

सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेबद्दल बोलतांना अनेक पोलीस पाल्य व नातेवाईकांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला, ज्यामुळे निरोप समारंभस्थळी वातावरण काहीसे भावनिक झाले होते. या निरोप समारंभाचा क्षण हा आमचे कायम स्मरणात राहील अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मा. राहुल माकनिकर पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मानव संसाधन विभागाच्या सहा. पोलीस आयुक्त श्रीमती सुनिता मेश्राम यांचे मार्गदर्शनात, पोनि. श्री. अमोल इंगोले, पोहवा. श्री. रोहीत गंपावार, किसनकुमार देवकाते, पोअं. लहु चिंचपुरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तथा आभारप्रदर्शन मसपोनि. श्रीमती पुनम कोरडे यांनी केले.









**(कामगिरी)**

**१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द चालान कारवाई.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, रेल्वे स्टेशन मेन गेट समोरील पानटपरीची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे टपरीचालक नामे आयुष सतिश माडगोविंदवार, वय २३ वर्ष रा. खलाशी लाईन, गोंड मोहल्ला, नागपूर हा वेगवेगळया कंपनीचे शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थाचे पाऊच व २३७ नग देशी दारुच्या बाटल्या असा मुद्देमाल विक्रीकरीता बाळगतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण १७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तंबाखुजन्य पदार्थ व अवैधरित्या देशी दारु बेकायदेशीर विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपी पानटपरीचालक याचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. मनोहर दंदाळे, पोहवा. अनुप लोलुसरे, आशिष गायधने, पोअं. अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर, चंद्रकांत मेहेत्रे, मपोअं. स्वाती पाटील यांनी केली.



**२) बेलतरोडी पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. ६८, संस्कृति सोसायटी, बेसा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी अविनाश मधुकर दुर्योधन वय ४५ वर्ष हे आपले राहते घरी रात्री जेवण करून झोपले असता, अज्ञात आरोपीने किचनचे खिडकीचे ग्रील तोडुन आत प्रवेश करून, फिर्यादीचे बेडरूममध्ये जावुन लाकडी आलमारी उघडुन आतमध्ये असलेल्या दोन लेडीज पर्स व एक जेन्ट्स पर्स मधुन एकुण १५,०००/—रू चोरी केले. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून दाखल करण्यात आला होता. तसेच हॉटेल अशोका, मनिष नगर येथुन एक वन प्लस कंपनीचा मोबाईल चोरीस गेल्यावरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. बेलतरोडी पोलीसांचे तपास पथकाने अंदाजे ३० ते ४० ठिकाणाचे सिसिटीव्ही फुटेज तपासुन तसेच, गुप्त माहीतीगार यांचे मदतीने आरोपीस निष्पन्न करुन, आरोपी निरज प्रभाकर उईके, वय २४ वर्षे रा. चांगदेव नगर झोपडपट्टी, खामला, पो. ठाणे प्रतापनगर, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने हॉटेल अशोका मनिष नगर येथुन वन प्लस कंपनीचा मोबाईल कि.अं. १०,०००/—रू. चोरल्याची कबुली दिली. तसेच, अधिक विचारपुस केली असता, त्याने बेसा परिसरामध्ये घरफोडी करून १५०००/—रू. चोंरी केल्याची व पोलीस ठाणे अजनी हद्यीत रामटेके नगर येथुन स्प्लेंडर बाईक क्र. एमएच ३१ डब्लुएस ६१७४ कि. अं.२०,०००/—रू. तसेच, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्यीतुन मोपेड ॲक्टिवा गाडी क्र. एम.एच.३१ डी.जी. ८२७३ वाहन चोरल्याचे सांगीतले. आरोपीकडून एकूण ०४ गुन्हे उघडकीस आणले व त्याचे ताब्यातुन ०१ मोबाईल, रोख ७००/—रु. व दोन वाहने असा एकुण ५०,७००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री रितेश आहेर, पोउपनि. किशोर मालोकर, रविकांत भदाने, पोहवा. सुहास शिंगणे, सुमेंद्र बोपचे, सचिन लाचरवार, पोअं. विवेक श्रीपाद यांनी केली.




**३) पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ६ चे विशेष पथकाची कामगिरी : जुगार खेळणारे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल :—**

मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ यांचे विशेष पथक यांनी दिनांक ३०.०८.२०२६ रोजी १४. ३० ते १५.२५ वा. चे दरम्यान, जुगाराबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीमध्ये नाका नंबर २, राजश्री लॉटरी नावाचे दुकानात रेड कारवाई केली असता, तिथे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता लॉटरीचा वापर करुन पैशांची खायवाडी व लगवाडी करुन जुगार खेळणारे इसम नामे १) आशिष घनश्याम गजभिये वय ४२ वर्ष रा. जयनगर, पांढराबोडी, २) रमेश चंद्रभानजी मुळे वय ४२ वर्ष रा. वाजपेयी नगर, कळमणा ३) विशाल राजकुमार ठाकूर वय २५ वर्ष रा. पिवळी नदी, नागपूर ४) ननिलकुमार प्रभुजी भगत

वय ४५ वर्ष रा. नाका नंबर २, भिलगाव, ५) सोलिन उपेन पाल वय ३७ वर्ष रा. भुगाव कामठी, नागपूर ६) विजय गोविंद वंजारी वय ४३ वर्ष रा. पाटीलनगर, भिलगाव, ७) संतोष रुपलाल नागेश्वर वय ४३ वर्ष रा. पाटील नगर, ८) दिलीप गोवर्धन खोब्रागडे वय ५५ वर्ष रा. विश्वभारती नगर, नागपूर ९) अतुल विश्वनाथ खोब्रागडे वय ३८ वर्ष रा. सुरगाव, उमरेड हे समक्ष मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन ०७ मोबाईल, टिव्ही, प्रिंटर व संगणकाचे मॉनिटर व रोख ५,३००/—रू. असा एकूण कि. ६३,५५०/—रु. चा जप्त करण्यात आला. आरोपींविरुध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम ४,५ म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांच्या मार्गदर्शनात श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रं ६ नागपूर शहर यांचे देखरेखीखाली विशेष पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाठोडा :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, वाठोडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, तरोडी बुद्रुक गाव, आऊटर रिंग रोड पुलाजवळ एका ॲक्टिवा गाडीवर संशयीतरित्या बसलेला इसम पोलीसांना पाहून पळू लागल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विजय श्यामरावजी चन्ने वय ५० वर्षे रा. प्लॉट क्र. ३८, गोपाळकृष्ण लॉनमागे, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०५ यांचे हद्दपार आदेश क्र. ४८/२०२५, दिनांक ३१.१२.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, त्याचे ताब्यातुन लाल रंगाची ॲक्टिवा क्र. एमएच ४९ बीव्ही ३६७५ कि. २०,०००/—रु. ची जप्त केली आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०८.२०२६ चे ०५.३० वा. ते दिनांक ३०.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्यीत नाईक तलाव, बांग्लादेश, श्रावण खापेकरचे घराजवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मुकेश मधुकर पराते वय ४१ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह सासुरवाडीला दुर्ग, छत्तीसगढ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख ३४,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,८४,४११/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. कृष्णा कोल्हेवाड ७५८८१९८६५८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे सदर :—** श्रीमती संगिता अशोक भलावी वय ५० वर्षे, रा. खलाशी लाईन, मोहननगर, कापसी माता मंदीरजवळ, सदर, नागपूर ह्या दिनांक २७.०७.२०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे सदर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता

मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–साधारण, उंची–४ फुट ६ इंच, केस–लाल लांब, अंगात– गुलाबी रंगाची साडी व लाल ब्लाऊज घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



श्रीमती संगिता

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**